# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

Maharashtra Industrial Development Corporation

(A Government of Maharashtra Undertaking)

मुख्य कार्यालय : "उद्योग सारथी", महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०९३.
Head Office : "Udyog Sarathi", Mahakali Caves Road, Andheri (East), Mumbai 400 093.
☏:०२२-४७४८४३१२/४७४८४६७९/९९

प्रिन्सिपल कार्यालय : ४,४ (ऐ) १२ वा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, सेंटर-१, कफ परेड, मुंबई ४०० ००५.
Principle Office : 4,4 (A), 12th Floor, World Trade Centre-1, Cuffe Parade, Mumbai-400 005.
☏: +९१-२२-४०१६१४५१/५४

www.midcindia.org


क्रमांक: मऔविम/भूविभाग/मव्य(भूमी)/P127778 दिनांक: 24/11/23

## परिपत्रक

**विषय: महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील भूखंड विकसीत करण्यासाठी मुदतवाढीसंदर्भात विशेष मुदतवाढ योजना लागू करणेबाबत.**

**संदर्भ:** परिपत्रक क्रमांक मऔविम/मव्य(भूमी)/ई-२८८३३, दिनांक २३.०१.२०२३

सद्य:स्थितीत कोव्हिडनंतर उद्भवलेली परिस्थिती, जागतिक औद्योगिक आर्थिक मंदी आणि त्याचा उद्योग जगतावर होत असलेला परिणाम इत्यादि कारणांमुळे बरेच उद्योजक भूखंडाचा ताबा घेतल्यापासुन / प्राथमिक करारनामा कार्यान्वित केल्याच्या दिनांकापासुन १ वर्षाच्या आत किंवा विकास कालावधीत सशुल्क वाढीव कालावधी घेऊन, बांधकाम नकाशे मंजुर करुन (Building Plan Approval) विहीत विकास कालावधीत इमारत पूर्णत्वाचा दाखला घेऊ शकले नसल्याचे निदर्शनास आले आहे. अशा भूखंडधारकांकडुन इमारत बांधकाम नकाशे मंजुर करुन घेऊन इमारत बांधकाम पूर्णत्वाचा दाखला प्राप्त करण्यासाठी विशेष मुदतवाढ मिळणेबाबत मागणी होत आहे. महाराष्ट्र राज्यात परकीय गुंतवणूकीचा वाढता ओघ (FDI) तसेच उद्योजकांची व औद्योगिक संघटनांची वाढती मागणी विचारात घेता, भूखंडधारकास एक वेळची विशेष संधी म्हणून वाढीव कालावधी / मुदतवाढ मंजुर करणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील भूखंड विकसीत करण्यासाठी मुदतवाढीसंदर्भात विशेष मुदतवाढ योजना लागू करणेबाबतचा प्रस्ताव महामंडळाच्या मा. सदस्य मंडळाच्या दिनांक १७.१०.२०२३ रोजी झालेल्या ३९७ व्या बैठकीमध्ये सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर बैठकीमध्ये सविस्तर चर्चा होऊन ठराव क्रमांक ६६१८ पारीत करण्यात आला असुन पुढीलप्रमाणे धोरण निश्चित करण्यात आले आहे.

(१) दिनांक २३.०१.२०२३ रोजीच्या परिपत्रकातील **सर्व अटी व शर्ती कायम ठेवून** अट क्रमांक ७ मध्ये नमूद नकाशे मंजुरीची (Building Plan Approval) अट परिपत्रक



For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

निर्गमित झाल्याच्या दिनांकापासुन ९० दिवसांसाठी शिथील करण्यात येत आहे. तथापि, यासाठी ५ टक्के अतिरीक्त अधिमुल्याची रक्कम वसुल करण्यात यावी.

(२) महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील भूखंड विकसीत करण्यासाठी परिपत्रक क्रमांक मऔविम/मव्य(भूमी)/ई-२८८३३, दिनांक २३.०१.२०२३ अन्वये लागू करण्यात आलेल्या विशेष मुदतवाढ योजनेअंतर्गत परिपूर्ण अर्ज स्विकारण्याची अंतिम मुदत दिनांक ३०.०६.२०२३ पर्यंत होती. परंतु, सुधारित परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकापासुन ९० दिवसांचे आत परिपूर्ण कागदपत्रांसह अर्ज सादर केल्यास अशा प्रकरणांमध्ये प्रकरणपरत्वे प्रस्ताव मंजुर झाल्यापासुन नकाशे मंजुरी व विकास कालावधीसाठी विशेष मुदतवाढ देण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम यांना प्रदान करण्यात येत आहेत.

(३) वरीलप्रमाणे विशेष मुदतवाढ मंजुर झाल्यानंतर भूखंडधारकाने सदर वाढीव कालावधीमध्ये बांधकाम नकाशे मंजुर करुन इमारत पूर्णत्वाचा दाखला प्राप्त करणे अनिवार्य आहे.

(४) जे भूखंडधारक सदर योजनेचा लाभ घेणार नाहीत अथवा ज्या भूखंडधारकांना वरील धोरणानुसार मुदतवाढ मंजुर करण्यात आलेली नाही व जे भूखंडधारक विहीत वाढीव कालावधीमध्ये भूखंडाचा विकास करुन इमारत पूर्णत्वाचा दाखला प्राप्त करणार नाहीत, अशा भूखंडधारकांकडुन प्रादेशिक कार्यालयाने विशेष मोहीम राबवून भूखंड परत घेण्याची कार्यवाही तात्काळ सुरु करावी.

सदरहु परिपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

24.11.23

**(अनिल भंडारी भा.प्र.से.)**
सह मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन)
मऔविम, मुंबई

प्रत:

(१) सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
(२) अतिरीक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे / नांदेड / नागपूर
(३) महाव्यवस्थापक (भूमी /विधी/ भूसंपादन/मा व तं/ जनसंपर्क/म.ब.वि./डीएमआयसी/ पणन)
(४) सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम,
(५) सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम,
(६) सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम,
(७) सह / उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई / पुणे / औरंगाबाद / नागपूर.
(८) सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र,
(९) सर्व औद्योगिक संघटना
(१०) मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती / मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ / जागतिक व्यापार केंद्र, मुंबई.



midcconsultants.in
For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in